**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

दिनांक :- १०/११/२०१८

**मुंबई आग्रा महामार्गावर गोंदे शिवारात मध्यरात्री थरार - स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा सिनेस्टाईल पाठलाग**
**घातक अग्निशस्त्र बाळगणारे ०३ सराईत गुन्हेगार स्थागुशाचे जाळयात**

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़े.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. स्थागुशाचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गावरील वाडीव-हे ते गोंदे शिवारात अवैधरित्या घातक अग्निशस्त्र बाळगणारे ०३ संशयीतांना सिनेस्टाईल पाठलाग करून ताब्यात घेतले आहे, त्यांचे कब्जातुन ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०५ जिवंत काडतुसांसह गुन्हयात वापरलेली स्विफ्ट कार हस्तगत केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी जिल्हयातील अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार तसेच बाहेरील जिल्हयांतुन शस्त्रांची अवैधरित्या देवाण-घेवाण करणारे इसमांबाबत सविस्तर माहिती घेवुन पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना कारवाई करणेबाबत सुचना दिल्या आहे. दरम्यान मुंबई शहरातुन काही संशयीत, घातक अग्निशस्त्र बाळगुन काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने नाशिक बाजुकडे येणार असल्याची खात्रीशीर बातमी **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना मिळाली होती. त्यानुसार आज दि. १० नोव्हेंबर २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मुंबई आग्रा महामार्गावर घोटी ते वाडीव-हे शिवारात सापळा रचला, दरम्यान घोटी बाजुकडुन नाशिक शहराकडे एक विनानंबरप्लेट असलेली सफेद रंगाची स्विफ्ट कार संशयीतरित्या येतांना दिसली. सदर कारचा स्थागुशाचे पथकाने पाठलाग सुरु केला, त्यावेळी कार चालकास पोलीस मागे लागल्याचा संशय आल्याने, त्याने गाडी भरधाव वेगाने पळविली दरम्यान पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी दोन वाहनांनी सदर कारचा सिनेस्टाईल पाठलाग सुरु केला, वाडीव-हे हद्दीतील गोंदे शिवारात थायसन ग्रुप कंपनीचे जवळ स्थागुशाचे कर्मचारी यांनी सदर स्विफ्ट कारला त्यांचेकडील वाहनाने ओव्हरटेक केले व दुस-या वाहनाने पाठीमागुन घेराव घालुन सदर स्विफ्ट कार अडविली. सदर वाहनातील ०३ संशयीत इसमांना स्थागुशाचे पथकाने जागेवरच शिताफिने ताब्यात घेतले. सदर वाहनाची झडती घेतली असता संशयीतांचे कब्जात पाठीमागील सिटवर असलेले **बॅगमध्ये ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०५ जिवंत काडतुसे** मिळुन आली. ताब्यात घेतलेले ०३ संशयीत नामे **१) गोकुळ शिवाजी गणेशकर,** वय २६, रा. मांडा टिटवाळा, ता.कल्याण, जि.ठाणे, **२) विशाल सुनिल गोंदके,** वय २३, **३) विनायक काशिनाथ माळी**, वय २३, दोन्ही रा.तुलसी व्हिला सोसायटी, मांडा टिटवाळा, ता.कल्याण, जि.ठाणे यांना सदर अग्निशस्त्रांचे परवान्याबाबत विचारपुस करता त्यांचेकडे कोणताही परवाना मिळुन आला नाही. सदर इसमांनी विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्रे कब्जात बाळगले म्हणुन त्यांचेविरूध्द **वाडीव-हे पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा** दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने वरील कारवाईत ताब्यात घेतलेला **आरोपी नामे गोकुळ गणेशकर** हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द **यापुर्वीही आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हे** दाखल आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन **०२ देशी बनावटीचे पिस्टल, ०५ जिवंत काडतुसे** तसेच गुन्हयात वापरलेली **सफेद रंगाची स्विफ्ट कार, ०३ मोबाईल फोन**, ०१ काळे रंगाची बॅग असा **एकुण ०४ लाख ०१ हजार १५० रू. किं.**चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन वरील तीनही आरोपींना गुन्हयाचे पुढील तपासकामी वाडीव-हे पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोउनि **श्री. स्वप्निल नाईक,** सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा बंडु ठाकरे, शिवाजी जुंदरे, दिलीप घुले, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, संदिप लगड, इम्रान पटेल, राजु वायकंडे यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. स्थागुशाचे पथकाने गेल्या ०४ दिवसांपुर्वीही अशीच कारवाई करत मालेगाव शहरात अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारे ०२ आरोपीतांना ताब्यात घेतले होते. जिल्हयातील अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांविरुध्द यापुढेही अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे. स्थागुशाचे पथकाने केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल **मा.पोलीस अधीक्षक सो यांनी <u>१५ हजार रूपयांचे</u> बक्षिस** जाहिर केले आहे.